8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

अजिंठा फिल्म सोसायटी व जेईएस महाविद्यालयात सामंजस्य करार

## विद्यार्थ्यांना चित्रपटनिर्मितीचे व्यावसायिक प्रशिक्षण मिळणार

### देवगिरी आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सवाच्या पोस्टरचेही अनावरण



**जालना । प्रतिनिधी**
विद्यार्थ्यांमध्ये चित्रपटकलेबाबतची जाण, सर्जनशीलता आणि तांत्रिक कौशल्य विकसित करण्याच्या उद्देशाने अजिंठा फिल्म सोसायटी, जालना समिती आणि जेईएस महाविद्यालय, जालना यांच्यात नुकताच सामंजस्य करार () करण्यात आला. या कराराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना चित्रपट अभ्यास, चित्रपटनिर्मिती, डॉक्युमेंटरी निर्मिती तसेच विविध शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक विषयांवरील दृश्य माध्यमांचा अभ्यास करण्याची संधी उपलब्ध होणार आहे.
या सामंजस्य करारामुळे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी वर्षभर विविध प्रशिक्षण कार्यक्रम, कार्यशाळा, प्रात्यक्षिके, चित्रपट प्रदर्शन, चर्चासत्रे आणि फिल्म ॲप्रिसिएशन ( ) उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. चित्रपट केवळ मनोरंजनाचे साधन नसून समाजप्रबोधन आणि प्रभावी संवादाचे माध्यम आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना चित्रपटाकडे चिकित्सक आणि अभ्यासपूर्ण दृष्टीने पाहण्याची संधी या उपक्रमातून मिळणार असल्याचे अजिंठा फिल्म सोसायटीच्या वतीने सांगण्यात आले.
याशिवाय फिल्म मेकिंग, डॉक्युमेंटरी फिल्म मेकिंग, पटकथा लेखन, दिग्दर्शन, छायांकन, संकलन (एडिटिंग), ध्वनीमुद्रण, अभिनय तसेच चित्रपटनिर्मितीची शास्त्रशुद्ध तांत्रिक प्रक्रिया याविषयी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण दिले जाणार आहे. सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक विषयांवर आधारित लघुपट निर्मितीसाठीही विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले जाणार असून, त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या करारातून केला जाणार आहे.
सामंजस्य करारावर जेईएस महाविद्यालयाचे प्राचार्य गणेशजी अग्निहोत्री, प्रा. यशवंत सोनवणे, अजिंठा फिल्म सोसायटीचे प्रांत पदाधिकारी डॉ. प्रसाद चौधरी तसेच जालना समितीचे अध्यक्ष मुकुंद दुसे यांनी स्वाक्षऱ्या करून सहकार्याचा संकल्प व्यक्त केला.
यावेळी प्राचार्य गणेशजी अग्निहोत्री यांच्या हस्ते ६ व्या देवगिरी इंटरनॅशनल शॉर्ट फिल्म फेस्टिव्हलच्या पोस्टरचे अनावरण करण्यात आले. या *(पान २ वर)*

## सेवानिवृत्तीच्या लाभांसाठी दीड लाखांची लाच घेताना प्राचार्यासह पाच जण ACBच्या जाळ्यात

### *सेवानिवृत्त प्रबंधकाकडून अर्जित रजा, GPF व पदोन्नती लाभासाठी मागितली होती लाच*

**जालना । प्रतिनिधी**
जालना शहरातील महात्मा ज्योतिबा फुले समाजकार्य महाविद्यालयातील सेवानिवृत्त प्रबंधकाच्या निवृत्तीनंतरचे आर्थिक लाभ मंजूर करून देण्यासाठी तब्बल १ लाख ५० हजार रुपयांची लाच स्वीकारताना प्राचार्यासह पाच जणांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ ताब्यात घेतले. गुरुवारी (६ ऑगस्ट) दुपारी महाविद्यालयात ही कारवाई करण्यात आली. या घटनेमुळे जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे. कारवाईत ताब्यात घेण्यात आलेल्यांमध्ये प्राचार्य राहुल नारायण हिवराळे (वय ५३), कार्यालय अधीक्षक बबन रामदास राठोड (वय ५१), पहारेकरी ईश्वरदास अंबादास शिंदे (वय ४८), लिपिक कैलास गबाजी कुरंगळे (वय ५२) आणि ग्रंथालय सहाय्यक ज्ञानेश्वर मुरलीधर मदन (वय ५१) यांचा समावेश आहे.
सेवानिवृत्त प्रबंधकाची कडे धाव लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, ५९ वर्षीय सेवानिवृत्त प्रबंधक यांनी ३० जुलै २०२६ रोजी ACB जालना कार्यालयात लेखी तक्रार दाखल केली होती. तक्रारदार हे ३० जून २०२५ रोजी महात्मा ज्योतिबा फुले समाजकार्य महाविद्यालयातून प्रबंधक पदावरून सेवानिवृत्त झाले होते. सेवानिवृत्तीनंतर त्यांना मिळणारे ३०० दिवसांच्या अर्जित रजेचे रोखीकरण (₹९,३३,४०८), कालबद्ध पदोन्नतीचा लाभ तसेच ची रक्कम मंजूर करून देण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी १ लाख ५० हजार रुपयांची लाच मागितल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला होता.

**पडताळणीत लाच मागणी सिद्ध**

तक्रार प्राप्त झाल्यानंतर ने ३० जुलै रोजी दुपारी १.०५ ते १.४८ या वेळेत तक्रारीची पडताळणी केली. या पडताळणीत संबंधित आरोपींकडून दीड लाख रुपयांच्या लाचेची मागणी करण्यात आल्याचे निष्पन्न झाल्यानंतर सापळा रचण्याचा निर्णय घेण्यात आला.
रंगेहाथ कारवाई
त्यानुसार ६ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १२.४२ ते १.५२ या *(पान २ वर)*

## जालना औषधी संघटनेची कार्यकारिणी बरखास्त; राज्य संघटनेकडून ॲडहॉक कमिटीची नियुक्ती

### संस्थापक अध्यक्ष प्रमोद तोतला यांचा दावा हिशोब न सादर करणे, मनमानी कारभार आणि नियमभंगाच्या तक्रारींची राज्य संघटनेने घेतली गंभीर दखल

**जालना । प्रतिनिधी**
जालना औषधी संघटनेच्या कार्यपद्धतीवर गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या वादाला नवे वळण मिळाले असून, महाराष्ट्र राज्य केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनने (राज्य संघटना) जालना औषधी संघटनेची विद्यमान कार्यकारिणी बरखास्त करून संघटनेचा कारभार विशेष (ॲडहॉक) समितीकडे सोपविल्याचा दावा संस्थापक अध्यक्ष प्रमोद तोतला यांनी केला आहे. या निर्णयामुळे जिल्ह्यातील औषध विक्रेता संघटनांमध्ये मोठी चर्चा सुरू झाली आहे.
प्रमोद तोतला यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, विद्यमान अध्यक्ष साईनाथ पवार यांनी गेल्या अनेक वर्षांपासून राज्य संघटनेला चुकीची माहिती देत संघटनेचा कारभार मनमानी पद्धतीने चालवला. संघटनेचे आर्थिक हिशोब, वार्षिक सर्वसाधारण सभा आणि इतर प्रशासकीय बाबींविषयी सातत्याने प्रश्न उपस्थित करूनही त्याची दखल घेतली जात नव्हती. अखेर राज्य संघटनेने या तक्रारींची गंभीर दखल घेत कार्यकारिणी बरखास्त करण्याचा निर्णय घेतल्याचा दावा त्यांनी केला.
हिशोब न सादर केल्याचा आरोप तोतला यांच्या *(पान २ वर)*

## राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांची बदनापूर येथील कृषि विज्ञान केंद्र भेट व पाहणी



**जालना -प्रतिनिधी**
महाराष्ट्र राज्याचे कृषि, वित्त, नियोजन, मदत व पुनर्वसन तसेच विधी व न्याय राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी आज (दि. ६ ऑगस्ट) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत कार्यरत कृषि विज्ञान केंद्र (केव्हीके), बदनापूर येथे भेट देऊन बायोमिक्स लॅबोरेटरी, माती परीक्षण प्रयोगशाळा, कृषी प्रदर्शन स्टॉल तसेच कृषी संशोधन केंद्रातील विविध उपक्रमांची पाहणी केली. यावेळी त्यांनी जैविक शेती, मृदा आरोग्य संवर्धन आणि शाश्वत कृषी विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे कौतुक करत समाधान व्यक्त केले.
राज्यमंत्री जयस्वाल यांनी सर्वप्रथम केव्हीके बदनापूर येथील बायोमिक्स लॅबोरेटरीला भेट देऊन तेथे तयार करण्यात येणाऱ्या विविध जैविक उत्पादनांची निर्मिती प्रक्रिया प्रत्यक्ष पाहिली. द्रवरूप जैविक खतांचे उत्पादन, त्यांचे दरपत्रक, गुणवत्ता नियंत्रण आणि शेतकऱ्यांसाठी त्यांचा होणारा उपयोग याबाबत त्यांनी सविस्तर माहिती जाणून घेतली. जैविक खतांच्या वापरामुळे मातीची सुपीकता व आरोग्य सुधारण्यास मदत होते, रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी होते, उत्पादन खर्चात बचत होऊन शेतकऱ्यांचा नफा वाढतो, असे सांगण्यात आले. या उपक्रमाचे त्यांनी विशेष कौतुक केले.
यानंतर त्यांनी माती परीक्षण प्रयोगशाळेला भेट देऊन माती आरोग्य पत्रिका तयार करण्याची प्रक्रिया, अन्नद्रव्य व्यवस्थापन आणि शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या शिफारशींची माहिती घेतली. कृषी प्रदर्शन स्टॉलवरील विविध जैविक उत्पादने, विस्तार साहित्य, सुधारित कृषी तंत्रज्ञान आणि शेतकरी हिताच्या विविध उपक्रमांची माहिती घेऊन ही उत्पादने व तंत्रज्ञान अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रभावी प्रयत्न करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.
यावेळी त्यांनी कृषि संशोधन केंद्र, बदनापूर येथील जंगली जातींच्या संवर्धित बागेलाही भेट दिली. केंद्रामार्फत विकसित करण्यात आलेल्या आणि शेतकऱ्यांमध्ये प्रसारित होत असलेल्या कडधान्य पिकांच्या सुधारित वाणांची त्यांनी माहिती जाणून घेतली. विशेषतः तूर पिकातील 'गोदावरी' वाण तसेच हरभरा पिकातील 'परभणी चना-१६' या सुधारित वाणांच्या वैशिष्ट्यांबाबत त्यांनी शास्त्रज्ञांशी सविस्तर चर्चा केली. *(पान २ वर)*



# संपादकीय...

## पाहणी दौरे पुरेसे नाहीत; जालन्याला कायमस्वरूपी जलनिस्सारण आराखडा हवा

मुसळधार पाऊस झाला की जालना शहरातील काही दृश्ये आता जवळपास ठरलेलीच असतात. रस्ते जलमय, घरांमध्ये शिरलेले पाणी, तुंबलेली गटारे, नागरिकांची धावपळ आणि त्यानंतर लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांचा पाहणी दौरा. दरवर्षी हा क्रम बदलत नाही; बदलतात फक्त पावसाच्या तारखा. महापौर, उपमहापौर आणि महानगरपालिका आयुक्तांनी गायत्रीनगर, कोठारीनगर, महेशनगर आणि हनुमान घाट परिसराची पाहणी करून अधिकाऱ्यांना तातडीच्या सूचना दिल्या, ही निश्चितच सकारात्मक बाब आहे. आपत्तीच्या काळात प्रशासनाने घटनास्थळी उपस्थित राहणे आवश्यकच आहे. मात्र यानिमित्ताने एक मोठा प्रश्न पुन्हा समोर येतोप्रत्येक पावसात त्याच भागात पाणी का साचते? जर एखादी समस्या एकदाच निर्माण झाली असती, तर ती नैसर्गिक आपत्ती मानता आली असती. पण तीच समस्या वर्षानुवर्षे त्याच भागात पुन्हा निर्माण होत असेल, तर तो केवळ निसर्गाचा परिणाम नसून नियोजनातील उणीवांचाही विषय ठरतो. शहराचा विस्तार झाला, नवीन वसाहती उभ्या राहिल्या, रस्ते रुंद झाले; पण त्याच वेगाने जलनिस्सारण व्यवस्था सक्षम झाली का? हा प्रश्न टाळून चालणार नाही. अनेक नाले अरुंद झाले, काही ठिकाणी अतिक्रमण झाले, तर काही ठिकाणी नियमित गाळ काढला जात नाही. परिणामी, काही तासांच्या पावसातही नागरिकांच्या घरात पाणी शिरते. पूरस्थितीनंतर पाहणी करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे; पण त्याहून मोठी जबाबदारी म्हणजे पूरस्थितीच निर्माण होऊ न देणे. आज गरज आहे ती ''फोटो पाहणी''पेक्षा डेटा-आधारित नियोजनाची. शहरातील कोणते भाग पूरप्रवण आहेत, पाणी कोणत्या मार्गाने वाहते, नाले किती क्षमतेचे आहेत, कुठे अडथळे निर्माण झाले आहेत, कोणत्या भागात पंपिंग स्टेशनची गरज आहे, याचा वैज्ञानिक अभ्यास होणे आवश्यक आहे. प्रत्येक पावसाळ्यानंतर लाखो रुपये तात्पुरत्या उपाययोजनांवर खर्च होतात. पण कायमस्वरूपी जलनिस्सारण आराखडा तयार करण्यासाठी किती गुंतवणूक झाली? हा प्रश्न नागरिक विचारत आहेत. महापालिकेने केवळ पाणी उपसण्यावर समाधान मानू नये. शहरासाठी आधुनिक स्टॉर्म वॉटर ड्रेनेज (पावसाच्या पाण्याचा स्वतंत्र निचरा) व्यवस्था उभारणे, नाल्यांचे डिजिटल मॅपिंग करणे, अतिक्रमण हटविणे आणि नियमित देखभाल यासाठी निश्चित कालबद्ध कार्यक्रम जाहीर करणे आवश्यक आहे. लोकप्रतिनिधींनीही प्रत्येक पावसाळ्यात पाहणी करण्याऐवजी आपल्या प्रभागातील कायमस्वरूपी उपाययोजनांवर भर दिला पाहिजे. नागरिकांना आश्वासनांपेक्षा परिणाम महत्त्वाचे वाटतात.

याचबरोबर नागरिकांचीही जबाबदारी कमी नाही. प्लास्टिक, कचरा आणि बांधकामातील मलबा नाल्यांमध्ये टाकल्यामुळे अनेक ठिकाणी पाणी तुंबते. त्यामुळे ही लढाई केवळ प्रशासनाची नसून नागरिकांच्या सहभागाचीही आहे. जालना शहर झपाट्याने वाढत आहे. हवामान बदलामुळे अतिवृष्टीच्या घटनाही वाढत आहेत. त्यामुळे जुन्या पद्धतीने शहर चालणार नाही. भविष्यातील पावसाचा विचार करून आधुनिक नागरी नियोजन स्वीकारावे लागेल. पाहणी दौरे आवश्यक आहेत; पण ते समस्येचा शेवट नसून सुरुवात असली पाहिजे. जर पुढील पावसाळ्यातही त्याच भागात पुन्हा पाणी साचले, तर यंदाच्या पाहणी दौऱ्याचा उद्देश काय होता, असा प्रश्न नागरिक नक्कीच विचारतील. जालन्याला प्रत्येक पावसात मदतीच्या नावांची यादी नको; पाणी घरात शिरणार नाही, अशी व्यवस्था हवी. कारण शहराची खरी प्रगती रस्त्यांच्या उद्घाटनात नाही, तर पावसातही नागरिक निर्धास्त राहतील अशा नियोजनात असते.

## राणीवाहेगाव पुनर्वसन येथे घर पाहण्यावरुन दोन गटांत तुफान हाणामारी; परतूर पोलिसांत परस्परविरोधी गुन्हे दाखल

**परतूर -प्रतिनिधी**

परतूर तालुक्यातील राणीवाहेगाव पुनर्वसन परिसरात घर पाहण्याच्या कारणावरून दोन गटांत जोरदार वाद होऊन तुफान हाणामारी झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या वादात एकावर चाकूने प्राणघातक हल्ला करून गंभीर जखमी करण्यात आले असून, या प्रकरणी परतूर पोलीस ठाण्यात दोन्ही बाजूंच्या तक्रारींवरून परस्परविरोधी गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पहिली घटना ५ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी २:०० वाजताच्या सुमारास घडली. फिर्यादी संजयसिंग हरजितसिंग जुन्नी (वय ३२, रा. शिकलकरी मोहल्ला, परतूर) हे आपले नातेवाईक जसपालसिंग यांनी घेतलेले घर पाहण्यासाठी राणीवाहेगाव पुनर्वसन येथे गेले होते. त्यावेळी यांनी बेकायदेशीर मंडळी जमवून वाद घातला. या वादात आरोपी हिने फिर्यादीस जिवे मारण्याच्या उद्देशाने हातातील चाकूने गळ्यावर व गालावर वार करून गंभीर जखमी केले, तर इतर आरोपींनी लाथाबुक्यांनी मारहाण केली. या तक्रारीवरून परतूर पोलिसांत बीएनएस कायद्याच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, या प्रकरणी दुसरी फिर्याद विजय शाहू काळे (वय ३०, रा. पाडळी पुनर्वसन, परतूर) यांनी दिली. त्यानुसार, ते आपल्या आत्याच्या (रेणुका बाबळू काळे) घरी आखाडी पूजेच्या कार्यक्रमासाठी आले असता आरोपी इतर ५ ते ६ अनोळखी लोकांनी बेकायदेशीरपणे जमून मारहाण केली. या फिर्यादीवरून आरोपींविरुद्ध बीएनएस कलमांसह भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.घटनेचे गांभीर्य ओळखून उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक भागवत, सहाय्यक पोलीस निरीक्षक जंजाळ आणि पोलीस उपनिरीक्षक चव्हाण यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. सध्या परिसरात शांतता असून या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक चव्हाण आणि पोलीस निरीक्षक जंजाळ करत आहेत.

# दोन राष्ट्रगीतांचे जनक; गुरुदेव रवींद्रनाथ टागोर

आज ७ ऑगस्ट, भारत मातेचे महान सुपूत्र , चित्रकार, नाटककार, कादंबरीकार, बंगाली कवी, संगितकार गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांची पुण्यतिथी. रवींद्रनाथ टागोर यांचा जन्म ७ मे १८६१ रोजी कोलकात्यातील जोर - सांको येथे झाला. त्यांच्या आईचे नाव शारदादेवी तर वडिलांचे नाव महर्षी देवेंद्रनाथ टागोर असे होते. रवींद्रनाथ टागोरांनी आपले शिक्षण घरीच विविध विषयांच्या खाजगी शिक्षकांच्या हाताखाली घेतले. त्यांनी लहान वयातच कविता लिहायला सुरुवात केली. वयाच्या आठव्या वर्षीच त्यांनी आपली पहिली कविता लिहिली. वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांनी भानुसिंह या टोपण नावाने बऱ्याचशा कविता लिहिल्या. बॅरिस्टर होण्याआधी त्यांनी लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेज येथे प्रवेश घेतला परंतु १८८० मध्ये कोणत्याही पदवी शिवाय ते बंगालमध्ये परतले. १४ नोव्हे १९१३ रोजी गीतांजली या रचनेबद्दल स्वीडीश अकादमीचा नोबेल पुरस्कार त्यांना देण्यात आला. गीतांजलीचे भाषांतर स्वतः रवीन्द्रनाथांनीच केले होते. रवींद्रनाथ हे भारताचे व आशियाचे पहिले नोबेल विजेते होत. १९१५ साली त्यांना ब्रिटीश सरकारने ''सर'' ही पदवी दिली. १९१९ च्या जालियनवाला बाग हत्याकांडानंतर त्यांनी ती सरकारला परत केली. रवीन्द्रनाथांनी रचलेली जन गण मन व आमार शोनार बांग्ला ह्या रचना अनुक्रमे भारत व बांगलादेश यांची राष्ट्रगीते म्हणून स्वीकारण्यात आल्या आहेत. दोन राष्ट्रगीतांचे जनकत्व असलेले रवीन्द्रनाथ हे जगातील एकमेव कवी आहेत. पारंपारिक शिक्षण केवळ पोपटपंची शिकवते या विचारातून शांतिनिकेतनाचा क्रांतिकारक प्रयोग त्यांनी राबवला. रविंद्रनाथकालीन भारतामध्ये सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक चळवळींचे प्रमुख केन्द्रांपैकी एक असलेल्या महाराष्ट्राचा प्रभाव रवींद्रनाथांवरही पडला होता. संत तुकारामांच्या साहित्याचा त्यांनी अभ्यास केला होता. संत तुकारामांचे काही अभंग त्यांनी बंगाली भाषेत अनुवादित केले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनही त्यांच्या साठी प्रेरणास्थान होते. छत्रपती शिवाजी महाराजांवर त्यांनी एक खंडकाव्यही रचले आहे. शांतीनिकेतनाची उभारणी, विस्तृत व उच्च दर्जाच्या साहित्याची निर्मिती व रवीन्द्रसंगीताचे सृजन हे रवीन्द्रनाथांचे प्रमुख जीवनकार्य होय. रवींद्रनाथ टागोरांना गुरुदेव असे संबोधले जाते, १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या प्रारंभी रवींद्रनाथांच्या कार्यामुळे बंगाली साहित्यात व बंगाली संगीतात आमूलाग्र बदल घडून आला. बंगाली साहित्याची रवींद्रपूर्व व रविंद्रोत्तर अशी विभागणी केली जाते यावरून बंगाली साहित्यावर रवींद्रनाथांच्या प्रभाव लक्षात येतो. एक महान कवी असण्यासोबतच ते एक महान देशभक्त होते त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात मोठ्या संख्येने भारतीय लोकांना प्रभावित केले. ७ ऑगस्ट १९४१ रोजी रवींद्रनाथ टागोर यांचे निधन झाले. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांना पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन.

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## अत्याधुनिक स्टुडिओमुळे मुंबई सर्जनशील अर्थव्यवस्थेचे जागतिक केंद्र बनेल – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई - प्रतिनिधी**

भारताला सर्जनशील अर्थव्यवस्थेचे (क्रिएटर इकॉनॉमी) जागतिक केंद्र बनविण्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे स्वप्न साकार करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांची आवश्यकता आहे. गोरेगाव येथील फिल्मसिटी परिसरातील प्राइम फोकसच्या नव्या अत्याधुनिक स्टुडिओमुळे या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले असून, मुंबई सर्जनशील उद्योगांचे जागतिक केंद्र म्हणून अधिक सक्षम होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. फिल्मसिटी परिसरात प्राइम फोकसच्या जागतिक दर्जाच्या अत्याधुनिक स्टुडिओच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, केंद्रीय माहिती व प्रसारण विभागाचे सचिव चंचल कुमार, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, दादासाहेब फाळके चित्रपट नगरी (फिल्मसिटी) च्या व्यवस्थापकीय संचालक




स्वाती म्हसे पाटील तसेच प्राइम फोकस समूहाचे पदाधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मुंबईत जागतिक दर्जाची सुविधा उभारून जगभरातील मनोरंजन आणि सर्जनशील उद्योगांना सेवा देण्याचा प्राइम फोकसचा संकल्प आज प्रत्यक्षात उतरला आहे. शासनाने हा प्रकल्प वेळेत पूर्ण होण्यासाठी आवश्यक सर्व सहकार्य केल्याचे सांगून 'वेव्हस २०२५' परिषदेदरम्यान झालेल्या सामंजस्य करारानंतर अवघ्या एका वर्षात या प्रकल्पाचा पहिला टप्पा पूर्ण झाला, ही उल्लेखनीय बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. भारतीय संस्कृती, परंपरा आणि इतिहासामध्ये असंख्य प्रेरणादायी कथा दडलेल्या आहेत. या कथा जागतिक स्तरावर पोहोचविण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि सक्षम सर्जनशील परिसंस्थेची गरज आहे. प्राइम फोकसची ही सुविधा त्या दृष्टीने देशासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

जगातील सर्वात मोठ्या चित्रपट सहनिर्मिती प्रकल्पांपैकी एक असलेल्या 'रामायण' चित्रपटाची निर्मिती या स्टुडिओमध्ये होत असल्याचा विशेष उल्लेख करत मुख्यमंत्री फडणवीस यांनी या चित्रपटाच्या संपूर्ण चमूचे अभिनंदन केले. भारतीय सर्जनशीलतेचा जागतिक स्तरावरील उत्कृष्ट नमुना म्हणून हा चित्रपट ओळखला जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. युवा पिढीच्या सर्जनशील क्षमतेला वाव देणे, रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करणे आणि मनोरंजन उद्योगासाठी सक्षम परिसंस्था उभारणे यासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. फिल्मसिटीचे जागतिक दर्जाच्या सर्जनशील आणि मनोरंजन केंद्रामध्ये रूपांतर करण्याचा व्यापक पुनर्विकास आराखडाही लवकरच पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

**संस्कृती आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान यांचा प्रभावी संगम ॲड. आशिष शेलार**

सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी प्राइम फोकसच्या उपक्रमाचे कौतुक करताना, संस्कृती आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान यांचा प्रभावी संगम या प्रकल्पातून साकार झाल्याचे सांगितले. सांस्कृतिक कार्य तसेच माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि इलेक्ट्रॉनिक्स या दोन्ही विभागांची जबाबदारी स्वीकारल्यानंतर प्राइम फोकसच्या या परिसरात संस्कृती आणि तंत्रज्ञान एकत्र येऊन समाजासाठी मूल्यनिर्मिती करणारे आदर्श उदाहरण पाहायला मिळाल्याचा उल्लेख त्यांनी केला.

पान १ व ४ वरुन...

### विद्यार्थ्यांना चित्रपटनिर्मितीचे..

महोत्सवाच्या माध्यमातून नवोदित दिग्दर्शक, निर्माते आणि कलाकारांना आपली कला सादर करण्याची संधी मिळणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

कार्यक्रमात बोलताना उपस्थित मान्यवरांनी आजच्या डिजिटल युगात चित्रपट माध्यमाचे वाढते महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी सर्जनशील विचारांना चालना देत सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून दर्जेदार चित्रपट आणि माहितीपट निर्मितीकडे वाटचाल करावी, असे आवाहनही करण्यात आले.या कार्यक्रमास प्राचार्य गणेशजी अग्निहोत्री, प्रा. यशवंत सोनवणे, प्रा. श्रीमती बियाणी, डॉ. प्रसाद चौधरी, मुकुंद दुसे, ज्येष्ठ दिग्दर्शक मिलिंद दुसे, अविनाश भंडे, गणेश कळकटे, अभिनेते पंकज साले, दिपक भालेराव, रामेश्वर वरखडे पाटील, अश्विनी आंधळे, साक्षी दांडगे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी आणि चित्रपट क्षेत्राशी संबंधित मान्यवर उपस्थित होते.

या सामंजस्य करारामुळे जालना जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना चित्रपटकलेचे आधुनिक ज्ञान, व्यावहारिक प्रशिक्षण आणि राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरील चित्रपट संस्कृतीची ओळख करून देण्यासाठी नवे व्यासपीठ उपलब्ध होणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

### जालना औषधी...

म्हणण्यानुसार, संघटनेचे आर्थिक हिशोब आणि ऑडिट अहवाल सादर करण्याबाबत अनेक वेळा लेखी पत्रव्यवहार करण्यात आला होता. राज्य संघटनेचे अध्यक्ष जगन्नाथ अप्पा शिंदे यांनीही तीन वेळा पत्र पाठवून हिशोब सादर करण्याचे निर्देश दिले होते. मात्र त्यानंतरही हिशोब सादर करण्यात आला नसल्याने राज्य संघटनेने कठोर भूमिका घेतल्याचे त्यांनी सांगितले. मनमानी कारभार केल्याचा दावा निवेदनात साईनाथ पवार यांच्या कार्यकाळात लोकशाही पद्धतीने निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांना दूर करून संघटनेचा कारभार एकहाती चालविण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. कार्यकारिणीच्या बैठकीत प्रश्न विचारणाऱ्या सचिव आणि सहसचिवांना पदावरून दूर करण्यात आले. अनेक वर्षे वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यात आली नाही तसेच कार्यकारिणी सदस्यांनाही आर्थिक व्यवहारांचा तपशील दिला गेला नसल्याचा दावाही करण्यात आला आहे. संस्थापक अध्यक्षाचे सदस्यत्व रद्द करण्याचा निर्णय वादग्रस्त प्रमोद तोतला यांनी सांगितले की, संघटनेतील कथित गैरकारभाराविरोधात आवाज उठवल्यामुळे स्वतःचे सदस्यत्व नियमबाह्य पद्धतीने रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. हा निर्णय संघटनेच्या घटनेविरोधात असल्याचे त्यांनी म्हटले असून, त्यानंतरच त्यांनी राज्य संघटनेकडे सविस्तर तक्रार दाखल केली होती. केमिस्ट कल्चरल हॉल आणि मालमत्तांबाबतही आरोप तोतला यांनी निवेदनात संघटनेच्या मालमत्तांबाबतही गंभीर आरोप केले आहेत. सदस्यांच्या आर्थिक सहभागातून उभारण्यात आलेला केमिस्ट कल्चरल हॉल कार्यकारिणीची मंजुरी न घेता भाड्याने देण्याचा प्रयत्न झाला. तसेच हॉलच्या देखभालीकडे दुर्लक्ष केल्यामुळे तो अनेक वर्षे अंधारात आणि जीर्ण अवस्थेत राहिल्याचा दावा करण्यात आला आहे. याशिवाय नरिमन नगर येथील सुमारे ६ हजार चौरस फूट भूखंड तसेच सीटीएमके शाळेसमोरील दोन हॉल यासारख्या संघटनेच्या मालमत्तांबाबतही निष्काळजीपणा झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. प्रशिक्षण व सभासदांच्या हिताकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप प्रमोद तोतला यांनी पुढे म्हटले आहे की, औषध विक्रेत्यांसाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण, संगणकीकरण, अन्न व औषध प्रशासनाच्या नियमांबाबत मार्गदर्शन, कार्यशाळा आणि जनजागृती उपक्रम आयोजित करण्यात आले नाहीत. संघटनेचे काम केवळ सामाजिक माध्यमांपुरते मर्यादित राहिल्याचा आरोपही त्यांनी केला. सदस्यत्वच नसताना अध्यक्षपद भूषवल्याचा दावा निवेदनात आणखी एक गंभीर दावा करण्यात आला आहे. संघटनेच्या घटनेनुसार संबंधित सदस्याचे औषध दुकान बंद झाल्यास त्याचे सदस्यत्व संपुष्टात येते. साईनाथ पवार यांचे दुकान तीन वर्षांपूर्वी बंद झाले होते, त्यामुळे त्यांचे सदस्यत्वच संपले होते. तरीही त्यांनी अध्यक्षपद कायम ठेवले, असा दावा तोतला यांनी केला आहे. या संदर्भात अन्न व औषध प्रशासनाकडे तक्रार केल्यानंतर संबंधित परवान्यांबाबत कारवाई झाल्याचाही उल्लेख त्यांनी केला. दरम्यान, जालना औषधी संघटनेच्या विद्यमान कार्यकारिणीबाबत करण्यात आलेले हे सर्व आरोप प्रमोद तोतला यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनातील दावे आहेत. या आरोपांवर साईनाथ पवार किंवा संबंधित पदाधिकाऱ्यांची अधिकृत प्रतिक्रिया अद्याप प्राप्त झालेली नाही. त्यांची भूमिका मिळाल्यानंतर तीही प्रसिद्ध करण्यात येईल. राज्य संघटनेकडून कार्यकारिणी बरखास्त करून विशेष (ॲडहॉक) समितीकडे कारभार सोपविण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्ह्यातील औषध विक्रेता संघटनेच्या पुढील वाटचालीकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### सेवानिवृत्तीच्या...

वेळेत महात्मा ज्योतिबा फुले समाजकार्य महाविद्यालय परिसरात च्या पथकाने सापळा राबविला. तक्रारदाराकडून १ लाख ५० हजार रुपयांची लाच स्वीकारल्यानंतर प्राचार्यासह पाचही जणांना ने ताब्यात घेतले. भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा

या प्रकरणी तालुका जालना पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ च्या कलम ७ व १२ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. गुन्हा नोंद झाल्यानंतर आरोपींना औपचारिक अटक करण्यात येणार असल्याचे ने सांगितले.

च्या पथकाची कारवाई ही कारवाई पोलीस निरीक्षक शरदचंद्र रोडगे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. पोलीस उपअधीक्षक बी. एस. जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ. अतिश तिडके, गजानन खरात, पोअं. गजानन कांबळे, गणेश चेके, शिवलिंग खुळे, अमोल चेके, मनोहर भुतेकर, संदीप लहाने तसेच चालक भालचंद्र बिनोरकर यांनी कारवाईत सहभाग घेतला.

या कारवाईस लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस अधीक्षक माधुरी केदार-कांगणे तसेच अपर पोलीस अधीक्षक शशिकांत सिंगारे यांचे मार्गदर्शन लाभले.

भ्रष्टाचाराविरोधात तक्रार करण्याचे आवाहन

दरम्यान, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणताही लोकसेवक लाचेची मागणी करत असल्यास किंवा भ्रष्टाचारासंदर्भात माहिती असल्यास तात्काळ शी संपर्क साधावा. नागरिकांची ओळख गोपनीय ठेवून कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे विभागाने स्पष्ट केले आहे. या कारवाईमुळे शैक्षणिक संस्थांमधील आर्थिक व्यवहारांची पारदर्शकता आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या लाभांशी संबंधित प्रक्रियेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, या प्रकरणाच्या पुढील तपासाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### राज्यमंत्री आशिष...

तूर, मुग व उडीद पिकांच्या जंगली जातींचे संवर्धन, त्यांचे जनुकीय महत्त्व आणि भविष्यातील सुधारित वाण विकसित करण्यामधील त्यांचे योगदान याविषयीही त्यांनी माहिती घेतली. भेटीदरम्यान राज्यमंत्र्यांनी कृषि महाविद्यालय, बदनापूर येथील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कृषी संशोधन, आधुनिक कृषी तंत्रज्ञान, नवोन्मेष, जैविक शेती आणि कृषी क्षेत्रातील उदयोन्मुख संधी याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत संशोधनाधिष्ठित शेतीचा प्रसार करण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे, कृषि महाविद्यालय, बदनापूरचे अधिष्ठाता डॉ. दीपक पाटील, डॉ. एस. बी. पवार, मोसंबी संशोधन केंद्र, बदनापूरचे प्रभारी अधिकारी डॉ. गजेंद्र जगताप, कृषि विज्ञान केंद्र, बदनापूरचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. सचिनकुमार दिगंबरराव सोमवंशी, विषय विशेषज्ञ (पीक संरक्षण) डॉ. सचिन रामचंद्र धांडगे, विषय विशेषज्ञ (विस्तार शिक्षण) डॉ. राहुल लक्ष्मणराव कदम, विषय विशेषज्ञ (कृषिविद्या) डॉ. दिपाली रमेश कांबळे, विषय विशेषज्ञ (पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र) प्रा. फारुक रुबाब तडवी तसेच कृषी संशोधन केंद्र, बदनापूरचे डॉ. प्रशांत सोनटक्के, डॉ. विष्णू गीते, डॉ. प्रशांत पगार, डॉ. नितीन पतंगे यांच्यासह इतर शास्त्रज्ञ, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. उपस्थित शास्त्रज्ञांनी विविध संशोधन प्रकल्प, जैविक खत निर्मिती, मृदा आरोग्य व्यवस्थापन आणि कृषी विस्तार उपक्रमांची सविस्तर माहिती राज्यमंत्र्यांना दिली.

### टिकारीया सायन्स...

राज्यभरातील विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेऊन मोठ्या उत्साहाने सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

### महाराष्ट्र राज्य बाल...

दिल्या आहेत. बालकांच्या हिताचे रक्षण, त्यांच्या अधिकारांचे संरक्षण आणि बाल संरक्षण व्यवस्थेची उत्तरदायित्वपूर्ण अंमलबजावणी या दृष्टीने आयोगाचा हा दौरा जालना जिल्ह्यासाठी महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

### इतर मागास बहुजन...

व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रथम वर्ष किंवा थेट द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी लागू आहे.

इतर मागास बहुजन कल्याण विभागाने पात्र विद्यार्थ्यांनी वेळेत ऑनलाइन अर्ज सादर करून या योजनेचा लाभ घ्यावा. तसेच जालना महानगरपालिका हद्दीपासून १० किलोमीटर अंतरावरील परिसरातील महाविद्यालयांमध्ये प्रथम वर्ष किंवा थेट द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनीच वसतिगृह योजनेसाठी अर्ज करावेत असे आवाहन केले आहे.

### जालना तालुका काँग्रेसची...

शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ''रघुपती राघव राजाराम'' आंदोलन प्रभावीपणे राबविण्यात येईल, असे बैठकीत ठरविण्यात आले. गावपातळीपर्यंत संघटन मजबूत करण्यावर भर

बैठकीत पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना प्रत्येक गावात जाऊन नागरिकांच्या समस्या जाणून घेण्याचे आवाहन करण्यात आले. आगामी आंदोलन यशस्वी करण्यासाठी बूथ, गाव आणि तालुका स्तरावर संघटन अधिक सक्षम करण्याचे निर्देश देण्यात आले.

सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने संघर्ष करणे ही काँग्रेसची भूमिका असून प्रत्येक कार्यकर्त्याने जनतेशी थेट संपर्क ठेवून त्यांच्या प्रश्नांना प्राधान्य द्यावे, असेही बैठकीत नमूद करण्यात आले. आंदोलनासाठी व्यापक जनसंपर्क मोहीम

आगामी आंदोलनाच्या अनुषंगाने प्रत्येक गावात जनजागृती, बैठका आणि जनसंपर्क अभियान राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. शेतकरी, महिला, युवक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर शासनाला जाब विचारण्यासाठी काँग्रेस पक्ष एकत्रितपणे रस्त्यावर उतरेल, असा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला. पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती

बैठकीस कल्याणराव दळे, राजेश राठोड, राजेंद्र राख, बदरभाई चाऊस, राजाभाऊ देशमुख, कृष्णा पडूळ, ज्ञानेश्वर डुकरे, अशोकराव उबाळे, नारायण वाडेकर, सोपान तिरुखे, ज्ञानेश्वर इंगोले, सुरेश कदम, नारायण (काका) शिंदे, गणेश खरात, फकिराव मोहिते, सर्जेराव पटेकर, लाला पाटील लकडे, विक्रम चव्हाण, सुधाकर ढोकळे, बाळू वाहुळे, काकासाहेब गवारे, देविदास चव्हाण यांच्यासह जालना तालुक्यातील अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. आंदोलन यशस्वी करण्याचा निर्धार

बैठकीच्या शेवटी उपस्थित सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आगामी ''रघुपती राघव राजाराम'' आंदोलन तालुकाभर प्रभावीपणे राबविण्याचा निर्धार व्यक्त केला. जनतेच्या न्याय्य हक्कांसाठी काँग्रेस पक्ष सातत्याने संघर्ष करेल आणि शासनाचे लक्ष वेधण्यासाठी लोकशाही मार्गाने आंदोलन उभारले जाईल, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.


# भ्रष्ट दानपेटी चोरट्यांना, देवाचा धाक वाटेनासा झालाय..?

....कुठलीही गोष्ट एकदा सरावाची, सवयीची, नेहमीची झाली की, त्याविषयी कुतूहल, भीती, आश्चर्य वाटणे संपून जाते. ती मग एक नित्याची आणि औपचारिक बाब बनून जाते, यापासून देवाचीही सुटका झालेली नाही, असे दिसत आहे. अलीकडच्या काळात अयोध्येतील राम मंदिरात दाननिधीची चोरी, केदारनाथ येथील आर्थिक घोटाळा, मुंबईतील सिद्धिविनायक मंदिरातील दानपेटीतील पैशांचा घोटाळा, इतकेच नव्हे तर कोल्हापूर जिल्हा आदमापूर संत बाळूमामा मंदिरातील दान घोटाळा, काही नामांकित गणपती मंडळांचा आर्थिक गैरव्यवहार, हे पाहिल्यावर या देवांची व्यवस्था पाहणारी जी मंडळी आहेत, त्यांना देवाचा धाक वाटेनासा झालेला आहे की काय असे वाटू लागते. अर्थात, या देवस्थानांची व्यवस्था पाहणारे सगळे भ्रष्ट आहेत, असे नाही. त्यामुळेच इतकी वर्षे या देवस्थानांचा कारभार चालत आला आहे. पण या व्यवस्थेतील जे लोक हा भ्रष्ट आचार करून भाविक भक्तांनी देवाला दिलेल्या दानातील रक्कम लंपास करत आहेत, हे पाहिल्यावर लोकांना असा प्रश्न पडतो, आपण आठ आठ, दहा दहा तास रांगा लावून या देवांचे दर्शन घेतो, इतके तास उभे राहून प्रतीक्षा केल्यावर सामान्य माणसाला जे दर्शन मिळते ते काही क्षणांपुरते असते. अर्थात, याला व्हीआयपी पासवाले अपवाद असतात. एक तर ते सेलिब्रिटी असतात किंवा त्यांनी आरामात दर्शन मिळण्यासाठी पैसे मोजलेले असतात. खरे तर देवाच्या दरबारी सगळे सारखेच, पण शेवटी स्टेटस



आणि आर्थिक परिस्थिती देवाच्या दारी हा भेद निर्माण करत असते. देवाच्या दरबारात होणारा हा भ्रष्ट कारभार पाहिल्यावर सामान्य भक्ताला असा प्रश्न पडतो, देवाने आपले भले करावे, आपल्याकडून काही वाईट घडू नये, अशी आपल्याला सद्बुद्धी द्यावी, अशी आपण देवाकडे प्रार्थना करत असतो. आपण काही वाईट केले तर देव आपले वाईट करेल, अशी भीती भाविकांना वाटत असते. आपल्या लहानपणीदेखील खोटे बोललात, वाईट काम केलेत तर देवबाप्पा कान कापेल, अशी भीती घालून देवभयाच्या माध्यमातून आई आपल्या मुलांना सुसंस्कारीत आणि प्रामाणिक बनवण्यासाठी धडे देत असते. देवाचा इतका जर दबदबा असेल, देव सर्वशक्तीमान असेल तर अशा भ्रष्ट लोकांना तो वेळीच का आवर घालू शकत नाही, रांगेतील भक्तांना त्याची भीती वाटते तर आपण दिलेल्या दानाची चोरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना देवाची भीती का वाटत नाही, असा प्रश्न रांगेत उभे राहून देवाचे दर्शन घेणाऱ्या भक्तांना पडल्याशिवाय राहत नाही.

धर्म, श्रद्धा आणि पैसा हे तिन्ही एकत्र आले की तिथे लालसा बोकाळते. मंदिर म्हणजे फक्त दगड-मातीची इमारत नाही. ती कोट्यवधी लोकांच्या श्रद्धेचं केंद्र आहे. माणूस जेव्हा हतबल होतो, तेव्हा तो देवाचा आधार शोधतो. नोकरीसाठी, आजारातून बरे होण्यासाठी, मुलांच्या भल्यासाठी तो नवस करतो, दान देतो. हे दान म्हणजे व्यवहार नाही. ते प्रेम आहे, कृतज्ञता आहे, विश्वास आहे. देवा, तू माझे भले केलेस, मी तुला एवढे देतो ही भावना असते.आणि याच पवित्र भावनेचा



बाजार काही लोक करतात. दानपेटीत टाकलेलं प्रत्येक नाणं, ऑनलाइन ट्रान्सफर केलेले हजार रुपये, सोन्या-चांदीचे -चांदीचे दागिने हे तो देवासाठी देत असतो. पण व्यवहारात ते जातात विश्वस्त मंडळाकडे, पुजाऱ्यांकडे, व्यवस्थापनाकडे. इथेच काही जण या दानाची वाटमारी करतात. हिशोबात गोलमाल, बनावट पावत्या, दानाचा पैसा राजकारणासाठी किंवा वैयक्तिक ऐषोरामासाठी वापरला जातो. अलीकडच्या काळात तर काही देवस्थाने पक्षीय दावणीला बांधली गेली आहेत. जेव्हा असे उघड होते तेव्हा सामान्य माणसाचा विश्वास डळमळतो. मी देवाला दिले होते, पण खाल्ले भ्रष्ट माणसाने. मग देवाची भीती त्यांना वाटत नाही का, असा प्रश्न त्याला पडतो. पहिली पातळी आहे श्रद्धेची आणि दुसरी आहे व्यवस्थेची. श्रद्धेच्या पातळीवर बघितले तर खरा भक्त कधीच घोटाळा करत नाही. जो खरोखर देव मानतो तो दुसऱ्याचा एक रुपयासुद्धा उचलत नाही. कारण त्याला देवाच्या भीतीपेक्षा देवावर विश्वास असतो. पण काही लोकांना भीतीही नसते आणि विश्वासही नसतो. कारण त्यांनी श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातला फरक पुसून टाकला आहे. त्यांच्यासाठी मंदिर म्हणजे एक संस्था आहे, दान म्हणजे उत्पन्न आहे. देव त्यांच्यासाठी फक्त ब्रँड आहे. दुसरी पातळी आहे व्यवस्थेची. घोटाळे होतात कारण जबाबदारी आणि पारदर्शकता नाही. मोठ्या मंदिरांकडे वर्षाला शेकडो कोटींचे दान येते. सिद्धिविनायक, तिरुपती, शिर्डी यांची आकडेवारी ऐकली की डोळे विस्फारतात. इतका पैसा हाताळणारी यंत्रणा जर कागदावर पारदर्शी नसेल, ऑडिट होत नसेल, सर्वसामान्याला हिशोब दिसत नसेल तर गैरप्रकार होणारच.

कोरोना काळात अनेक मंदिरे बंद होती, तरीही दान सुरू होते. मग ते गेले कुठे? हा प्रश्न विचारणाऱ्याला आस्थेवर प्रश्न विचारू नको असे सांगितले जाते. पण आस्था आणि अंधभक्ती यात फरक आहे. गैरप्रकार करणाऱ्याला शिक्षा करण्यासाठी देवाने माणसालाच विवेक दिला आहे. कायदे दिले आहेत. जेव्हा आपण देव बघून घेईल म्हणून गप्प बसतो, तेव्हा आपणच भ्रष्ट लोकांना मोकळीक देतो. त्यामुळे दान देताना जागरूक रहायला हवे. पावती घ्यायला हवी. मंदिराचा वार्षिक अहवाल मागायला हवा. ऑनलाइन दान देत असाल तर अधिकृत वेबसाईटचा वापर करायला हवा. सरकारने आणि विश्वस्तांनी दर सहा महिन्याला खर्चाचा तपशील सार्वजनिक करायला हवा. कोणत्या कामासाठी किती खर्च झाला हे संकेतस्थळावर असले पाहिजे. तिसरे, सर्वात महत्त्वाचे, आपण देवाला मंदिरापुरता मर्यादित न करता जगण्यात आणला पाहिजे. खऱ्या अर्थाने देवाची पूजा म्हणजे दुसऱ्याला न फसवणे. गरजूला मदत करणे. प्रामाणिकपणे जगणे. कोण फसवणूक करतोय, कोण श्रद्धेचा बाजार मांडतोय हे उघडे पाडले पाहिजे. नाहीतर एक दिवस असे होईल की माणूस मंदिरात जायलाच घाबरेल. याचा विचार देवस्थानांच्या विश्वस्थांनी आणि कर्मचाऱ्यांनी करण्याची गरज आहे.



**ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले**
**मु.पो.मासा बेलेवाडी**
**कागल-कोल्हापूर..९८६७७३२५०४**

# घोगरे स्टेडियमवर श्री गजानन महाराज पालखीचा मुक्काम; हजारो भाविकांच्या स्वागतासाठी जालना सज्ज

## नगरसेवक महावीर ढक्का यांच्या पुढाकाराने पूर्वतयारीला वेग; स्वच्छता, मुरूम, पाणी, मंडप व २० मोबाईल टॉयलेट्सची व्यवस्था

**जालना । प्रतिनिधी**

पंढरपूरहून शेगावकडे प्रस्थान करणाऱ्या श्री संत गजानन महाराज पालखीचे शनिवार, दि. ९ ऑगस्ट रोजी दुपारी ४ वाजता जालना शहरातील कल्याणराव घोगरे स्टेडियम येथे मुक्काम होणार असल्याने शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही हजारो वारकरी व भाविक पालखीसोबत जालन्यात दाखल होणार असल्याने त्यांच्या स्वागतासाठी आणि मुक्कामाच्या ठिकाणी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिका प्रशासन व लोकप्रतिनिधींनी युद्धपातळीवर तयारी सुरू केली आहे. प्रभाग क्रमांक ९ चे नगरसेवक महावीर ढक्का यांच्या मार्गदर्शनाखाली घोगरे स्टेडियम परिसरासह आजूबाजूच्या भागात स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. मुक्कामाच्या ठिकाणी पावसामुळे चिखल होऊ नये यासाठी रस्ते आणि मोकळ्या जागांवर मोठ्या प्रमाणात मुरूम टाकण्याचे काम सुरू आहे. भाविकांना स्वच्छ आणि सुरक्षित वातावरण मिळावे, यासाठी प्रत्येक कामावर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे. पालखी सोहळ्यादरम्यान हजारो भाविक मुक्कामाला येणार असल्याने पिण्याच्या पाण्याची पुरेशी व्यवस्था, मंडप उभारणी, प्रकाशयोजना, स्वच्छतागृहांची



सुविधा आणि सुरक्षा व्यवस्थेवर विशेष भर देण्यात आला आहे. भाविकांच्या सोयीसाठी २० मोबाईल टॉयलेट्स उभारण्यात येणार असून, परिसरात नियमित स्वच्छता राखण्यासाठी अतिरिक्त कर्मचारीही नियुक्त करण्यात येणार आहेत. तसेच आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत संबंधित विभागांना सूचनाही देण्यात आल्या आहेत.

नगरसेवक महावीर ढक्का यांनी संबंधित अधिकाऱ्यांसोबत मुक्कामस्थळाची पाहणी करून सुरू असलेल्या कामांचा आढावा घेतला. पालखी सोहळ्यादरम्यान भाविकांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. धार्मिक सोहळ्याला साजेशा वातावरणात सर्व सुविधा उपलब्ध करून देणे हे प्रशासनाचे प्राधान्य असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. या पाहणीवेळी स्वच्छता निरीक्षक संतोष पाटोळे, माऊली आघाव, अमित घायाळ, सतीश मदन, विजय जगताप, भागवत राऊत, शेखर देशमुख आणि राकेश पवार उपस्थित होते. त्यांनी सुरू असलेल्या स्वच्छता व सुविधा उभारणीच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक सूचना दिल्या. श्री संत गजानन महाराज पालखीचे जालन्यातील आगमन हा भाविकांसाठी श्रद्धा, भक्ती आणि सेवाभावाचा महत्त्वाचा सोहळा मानला जातो. पालखीच्या स्वागतासाठी विविध सामाजिक, धार्मिक संस्था तसेच नागरिकांकडूनही तयारी सुरू असून, संपूर्ण शहर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघण्याची चिन्हे आहेत. महानगरपालिका प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि विविध विभागांच्या समन्वयातून मुक्कामस्थळी सर्व मूलभूत सुविधा वेळेत उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले असून, यंदाही जालना शहर श्री संत गजानन महाराजांच्या पालखीचे उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात स्वागत करण्यासाठी सज्ज झाले आहे.

# शासकीय वसतिगृहात व्यावसायीक विभागाच्या प्रवेशासाठी अर्ज करण्याचे आवाहन

जालना, दि.६ (जिमाका) : समाज कल्याण विभागामार्फत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह जालना, भोकरदन, अंबड, बदनापुर, घनसावंगी, संत रामदास शासकीय वसतिगृह, जालना व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृह, जालना, अंबड, मंठा, भोकरदन या शासकीय वसतिगृहामध्ये सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी व्यावसायीक विभागाच्या प्रवेशासाठी मोफत प्रवेश देण्यात येत आहेत. त्यामुळे गरजु व पात्र विद्यार्थ्यांनी आजच संकेतस्थळाला भेट देण्यात यावी. व्यावसायीक विभागाच्या प्रवेशासाठी दि. १५ सप्टेंबर २०२६ रोजी पर्यंत ऑनलाईन अर्ज करता येईल.

यासाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, अनाथ, दिव्यांग, इतर मागासवर्गीय, विशेष मागासप्रवर्गासह इतर प्रवर्गाच्या इयत्ता आठवी, कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालय, व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वसतिगृहामध्ये रिक्त असणाऱ्या जागेवर विनामुल्य प्रवेश ऑनलाईन पध्दतीने गुणवत्तेनुसार देण्यात येणार आहे.

जर गुणवत्तेनुसार किंवा जागेअभावी विद्यार्थ्याला शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळाला नाही, तरच त्याला ''भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनचा अर्ज सादर करता येईल. जे विद्यार्थी वसतिगृह योजनेचा अर्ज भरणार नाहीत त्यांना ''भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना व वसतिगृह दोन्ही योजनेचा लाभ मिळणार नाही.

# दाढेगाव येथे ३१ वर्षापासून अखंड हरिनाम सप्ताहाचे उत्साहात आयोजन

**धाकलगाव - प्रतिनिधी**

श्री सद्गुरु सत्यानंद बाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त आणि त्यांच्या आशीर्वादाने नवतरुण मित्र मंडळ व समस्त ग्रामस्थ मंडळी दाढेगाव यांच्या वतीने ३१ वर्षापासून अखंड हरिनाम सप्ताह, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व श्रीमद् भागवत कथा सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा शुक्रवार, ३१ जुलै २०२६ ते शुक्रवार, ७



ऑगस्ट २०२६ या कालावधीत उत्साहात पार पडत आहे.या सप्ताहात दररोज सकाळी काकडा भजन, विष्णु सहस्रनाम, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, भागवत कथा, हरिपाठ आणि रात्री कीर्तन कार्यक्रम सुरु आहे. शुक्रवार रोजी ह.भ. प. लक्ष्मन उबाळे महाराज याचे काल्याचे किर्तन होईल व त्यानतर महाप्रसादाचा होईल परिसरातील सर्व भक्तांनी घ्यावा असे आवाहन नवतरुण मित्र मंडळ व समस्त ग्रामस्थ मंडळी दाढेगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# इंडिया स्किल्स कॉम्पिटिशन २०२६-२७ साठी नोंदणी करण्याचे आवाहन

**जालना -प्रतिनिधी**

राष्ट्रीय कौशल्य विकास परिषद () यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात येणाऱ्या इंडिया स्किल्स कॉम्पिटिशन २०२६-२७ या देशातील सर्वात प्रतिष्ठित कौशल्य स्पर्धेसाठी नोंदणी सुरू झाली आहे. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, विविध सेक्टर स्किल कान्सिल तसेच औद्योगिक आस्थापनांच्या सहकार्याने जिल्हा, विभाग आणि राज्य स्तरावर या स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार असून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या स्पर्धकांना राष्ट्रीय स्तरावर निवड होण्याची तसेच जागतिक स्तरावरील वर्ल्डस्किल कॉम्पिटिशन मध्ये भारताचे प्रतिनिधित्व करण्याची सुवर्णसंधी उपलब्ध होणार आहे. जागतिक कौशल्य स्पर्धा दर दोन वर्षांनी आयोजित केली जाते. ही स्पर्धा व्यावसायिक शिक्षण व कौशल्य उत्कृष्टतेच्या क्षेत्रातील जगातील सर्वात मोठी स्पर्धा मानली जाते. २३ वर्षांखालील युवक-युवतींना कौशल्य सादर करण्याची ही स्पर्धा ऑलिम्पिक खेळासारखीच असते, हे विविध कौशल्य क्षेत्रांमध्ये आपले ज्ञान, गुणवत्ता व प्राविण्य सिद्ध करण्यासाठी हे एक प्रभावी व्यासपीठ आहे. इंडिया स्किल्स कॉम्पिटिशन २०२६-२७ करिता वयोमर्यादा हा एकमेव पात्रतेचा निकष असून ५६ कौशल्य क्षेत्रांकरिता उमेदवाराचा जन्म दि. १ जानेवारी २००३ किंवा त्यानंतरचा असणे आवश्यक आहे.

तसेच सायबर सिक्योरिटी, इंडस्ट्री ४.०, मेकॅट्रॉनिक्स आणि रोबोट सिस्टम इंटेग्रशन या टिम स्किल गटातील स्पर्धांसाठी उमेदवाराचा जन्म दि. १ जानेवारी २००३ किंवा त्यानंतरचा असणे आवश्यक आहे. तसेच ऑटोनॉमस मोबाईल रोबोटिक्स, काँक्रीट कन्स्ट्रक्शन वर्क आणि लँडस्केप गार्डनिंग या टिम स्किल गटातील स्पर्धांसाठी उमेदवाराचा जन्म दि. १ जानेवारी २००६ किंवा त्यानंतरचा असणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील सर्व महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था (), कौशल्य प्रशिक्षण संस्था, अभियांत्रिकी महाविद्यालये, पॉलिटेक्निक, उद्योग-आस्थापना तसेच संबंधित शैक्षणिक संस्थांनी पात्र युवक-युवतींमध्ये या स्पर्धेबाबत जनजागृती करून इंडियास्किल्स कॉम्पिटिशन २०२६-२७ स्पर्धेसाठी इच्छुक उमेदवारांनी संकेतस्थळावर भेट देऊन ऑनलाइन नोंदणी करावी. असे आवाहन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# एसआयआर प्रक्रियेसाठी दोन ते तीन महिन्यांची मुदतवाढ द्या; राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार)ची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**जालना -प्रतिनिधी**

मतदार यादीच्या विशेष सघन पुनरिक्षण () प्रक्रियेसाठी देण्यात आलेली मुदत अपुरी असल्याचा दावा करत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) जालना शहरचे उपाध्यक्ष तय्यब बापू देशमुख यांनी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांना निवेदन सादर करून किमान दोन ते तीन महिन्यांची मुदतवाढ देण्याची मागणी केली आहे.

अन्यथा अनेक पात्र मतदारांची प्रक्रिया अपूर्ण राहण्याची शक्यता असून त्यातून नागरिकांमध्ये संभ्रम आणि भीतीचे वातावरण निर्माण होत असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, ८ जुलै २०२६ रोजीही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी दोन ते तीन महिन्यांची मुदत वाढवून देण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र प्रशासनाकडून केवळ आठ ते दहा दिवसांची अतिरिक्त मुदत देण्यात आली. ही मुदत प्रत्यक्ष परिस्थिती लक्षात घेता अत्यंत अपुरी असल्याचे देशमुख यांनी म्हटले आहे.

त्यांच्या म्हणण्यानुसार, जालना विधानसभा मतदारसंघातील अनेक



भागांत प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही. अनेक बूथ लेव्हल ऑफिसर () यांना संबंधित मतदार घरी मिळत नसल्याने प्रक्रिया रखडत आहे. काही ठिकाणी बीएलओंना मतदारांची माहिती मिळण्यात अडचणी येत असून, काही प्रकरणांमध्ये स्वतः नागरिकांकडून फॉर्म भरून घेण्याची वेळ येत असल्याचा दावाही निवेदनात करण्यात आला आहे. देशमुख यांनी पुढे म्हटले आहे की, शहरातील अनेक प्रभागांमध्ये अजूनही मोठ्या प्रमाणात अर्ज प्रलंबित आहेत. काही प्रभागांमध्ये २०० ते ३००, तर काही ठिकाणी १०० ते १५० अर्ज अद्याप भरायचे बाकी असल्याची माहिती त्यांनी दिली. अशा परिस्थितीत अल्प मुदतीत संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करणे शक्य नसल्याने किमान दोन ते तीन महिन्यांची मुदतवाढ आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

निवेदनात प्रशासनासमोर आणखी एक महत्त्वाचा मुद्दा मांडण्यात आला आहे. जर मुदतवाढ न देता प्रक्रिया पूर्ण झाली नाही, तर ज्या नागरिकांची प्रक्रिया अपूर्ण राहील त्यांचे पुढे काय होणार, याबाबत नागरिकांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला आहे. भविष्यात अशा मतदारांना कोणत्या सुविधा मिळणार किंवा त्यांच्यासाठी कोणती पर्यायी व्यवस्था असेल, याबाबत जिल्हा प्रशासनाने अधिकृतपणे स्पष्ट सूचना प्रसिद्ध कराव्यात, अशी मागणीही करण्यात आली आहे.

तय्यब देशमुख यांनी म्हटले आहे की, जालना महानगरातील अनेक नागरिकांमध्ये '' प्रक्रिया पूर्ण झाली नाही तर आपले पुढे काय होईल?'' अशी भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे प्रशासनाने जनतेच्या मनातील संभ्रम दूर करण्यासाठी अधिकृत पत्रक किंवा जनजागृती अभियान राबवून स्पष्ट माहिती द्यावी, अशी विनंती त्यांनी केली आहे. प्रशासनाने प्रत्यक्ष परिस्थितीचा विचार करून बीएलओंवरील कामाचा ताण, प्रलंबित अर्जांची संख्या आणि नागरिकांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन प्रक्रियेसाठी पुरेसा कालावधी द्यावा, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

दरम्यान, प्रक्रियेच्या मुदतवाढीच्या मागणीमुळे जालना शहरातील मतदार नोंदणी प्रक्रियेचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला असून, याबाबत जिल्हा प्रशासन काय निर्णय घेते, याकडे नागरिकांसह राजकीय पक्षांचे लक्ष लागले आहे.

# शेतकरी कर्जमाफी योजनेच्या अंमलबजावणीचा थेट गावात जाऊन आढावा; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानुसार शेतकऱ्यांशी थेट संवाद

**अंबड - प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारने सुरू केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अंबड तालुक्यातील गहिनीनाथ नगर येथे विशेष आढावा बैठक व शेतकरी संवाद पार पडला. माजी आमदार तथा भाजपा प्रदेश सरचिटणीस सुनील राणे, समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन तथा भाजपा नेते सतीश घाटगे पाटील आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष राहुल लोणीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा शेतकरी संवाद कार्यक्रम पार पडला. यावेळी उपस्थितांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत त्यांना कर्जमाफी योजनेचा लाभ घेताना येत असलेल्या अडचणी व प्रश्न जाणून घेतले. यावेळी सुनील राणे यांनी लाभार्थी शेतकरी, स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधताना कर्जमाफी योजनेची सद्यस्थिती, लाभ वितरणाची प्रक्रिया, शेतकऱ्यांना येत असलेल्या अडचणी तसेच केवायसी () प्रक्रियेसंदर्भातील प्रश्नांचा सविस्तर आढावा घेतला. शेतकऱ्यांनी मांडलेल्या सर्व अडचणी





व समस्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत पोहोचवून त्या तातडीने सोडविण्यात येतील, असे आश्वासन सुनील राणे यांनी यावेळी दिले. तसेच भाजपा नेते सतीश घाटगे यांनी देखील बँकेच्या तांत्रिक अडचणींमुळे आणि झिरो आयटीआरमुळे शेतकरी कसे कर्जमाफीपासून वंचित राहत आहेत, याची अभ्यासपूर्ण माहिती सुनील राणे यांना दिली. कर्जमाफी योजनेचा लाभ प्रत्येक पात्र शेतकऱ्यापर्यंत वेळेत, पारदर्शकपणे आणि प्रभावीपणे पोहोचावा तसेच कोणताही पात्र शेतकरी यापासून वंचित राहू नये, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. त्या अनुषंगाने घनसावंगी विधानसभा क्षेत्रातील शेतकऱ्यांनी कर्जमाफीतील त्रुटी व अडचणी तातडीने दूर करण्यासाठी अंबड व घनसावंगी येथील भाजपा जनसेवा कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन सतीश घाटगे यांनी यावेळी शेतकऱ्यांना केले. सरकार शेतकऱ्यांच्या हितासाठी कटिबद्ध असून, प्रत्येक पात्र शेतकऱ्याला न्याय मिळेपर्यंत सरकार व पक्ष त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला. या प्रसंगी भाजपचे पदाधिकारी किरण पाटील, भाजपचे मराठवाडा समन्वयक नितीन काळे, भाजपचे बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, जिल्हा सरचिटणीस गोविंद ढेंबरे, तालुका अध्यक्ष शिवाजी मोरे, जीवनराव वगरे, बाळासाहेब बोरकर, जिल्हा उपाध्यक्ष शंकर लहामगे, सरपंच पांडुरंग खटके, अनिरुद्ध झिंजुर्डे, प्रेमानंद उढाण, भगवान बर्वे, चंद्रकांत बांगर, रामेश्वर माने, राजेंद्र छल्लारे यांच्यासह स्थानिक शेतकरी, कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## टिकारीया सायन्स हॉबी सेंटरतर्फे राज्यस्तरीय विज्ञान निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन

*विज्ञान शिक्षण आणि मी विषयावर इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी संधी; विजेत्यांना मायक्रोस्कोप, टेलिस्कोप व पेरिस्कोप मेकिंग किटची बक्षिसे*

**जालना । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी आवड निर्माण करणे, वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे, सर्जनशील विचारांना चालना देणे आणि लेखनकौशल्याला वाव मिळावा या उद्देशाने टिकारीया सायन्स हॉबी सेंटर, जालना यांच्या वतीने राज्यस्तरीय विज्ञान निबंध लेखन स्पर्धा २०२६ आयोजित करण्यात आली आहे. राज्यभरातील इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा खुली असून, विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.




स्पर्धेचा विषय ''विज्ञान शिक्षण आणि मी'' असा ठेवण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना मराठी, हिंदी किंवा इंग्रजी या तीनपैकी कोणत्याही एका भाषेत निबंध लिहिता येणार आहे. निबंध ४ आकाराच्या कागदावर स्वच्छ हस्ताक्षरात चार पानांपर्यंत लिहून पाठविणे आवश्यक आहे. ऑनलाइन सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांनीही स्वतःच्या हस्ताक्षरातील निबंधाचा स्पष्ट स्कॅन अथवा छायाचित्र पाठविण्याची अट आयोजकांनी घातली आहे.

स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क ५० रुपये निश्चित करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड अधिक वाढावी आणि प्रयोगशीलतेला प्रोत्साहन मिळावे, यासाठी आकर्षक पारितोषिकांची घोषणा करण्यात आली आहे. प्रथम क्रमांकाच्या विजेत्याला मायक्रोस्कोप, द्वितीय क्रमांकासाठी टेलिस्कोप मेकिंग किट, तर तृतीय क्रमांकासाठी पेरिस्कोप मेकिंग किट प्रदान करण्यात येणार आहे. याशिवाय स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

निबंध सादर करण्याची अंतिम मुदत २० ऑगस्ट २०२६ असून, प्राप्त झालेल्या निबंधांचे तज्ज्ञ परीक्षकांकडून परीक्षण केले जाणार आहे. स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव ५ सप्टेंबर २०२६ रोजी जालना येथे आयोजित करण्यात येणाऱ्या पारितोषिक वितरण समारंभात करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपले हस्तलिखित निबंध टिकारीया सायन्स हॉबी सेंटर, सदर बाजार पोलीस स्टेशन रोड, बालाजी गल्ली, जालना ४३१२०३ या पत्त्यावर पाठवावेत. स्पर्धेविषयी अधिक माहितीसाठी ८०८७२ ७३७७२ किंवा ८७८८१ ६४२७४ या क्रमांकांवर संपर्क साधता येणार आहे.

विज्ञान विषयाकडे विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासक्रमाचा भाग म्हणून न पाहता दैनंदिन जीवनाशी जोडून विचार करावा, विज्ञानाधिष्ठित समाज घडविण्यात आपले योगदान द्यावे आणि आपल्या कल्पना प्रभावीपणे लेखनातून मांडाव्यात, या उद्देशाने या राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले.

*(पान २ वर)*

## महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचा आज जालना दौरा; बालहक्कांच्या प्रकरणांवर सुनावणी व विभागीय आढावा

महसूल भवनात सकाळी ११ वाजता विशेष बैठक; बाल संरक्षण यंत्रणेतील समन्वय, प्रलंबित प्रकरणे आणि योजनांच्या अंमलबजावणीची होणार समीक्षा

**जालना । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील बालकांचे हक्क प्रभावीपणे संरक्षित व्हावेत, बालहक्कांशी संबंधित प्रकरणांचा वेळेत निपटारा व्हावा तसेच बाल संरक्षण यंत्रणा अधिक सक्षम आणि उत्तरदायी व्हावी या उद्देशाने महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचा शुक्रवार, ७ ऑगस्ट २०२६ रोजी जालना जिल्हा दौरा आयोजित करण्यात आला आहे. या दौऱ्याअंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे सकाळी ११ वाजता बालहक्क विषयक प्रकरणांची सुनावणी तसेच विविध विभागांच्या अधिकाऱ्यांसमवेत आढावा बैठक होणार आहे.

जिल्हा महिला व बालविकास विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या विशेष दौऱ्यात आयोगाकडून जिल्ह्यातील बालहक्क विषयक प्रलंबित प्रकरणांचा सखोल आढावा घेण्यात येणार आहे. बालकांच्या संरक्षण, पुनर्वसन, शिक्षण, आरोग्य, सुरक्षितता तसेच त्यांच्या कायदेशीर हक्कांशी संबंधित विविध प्रकरणांवर सुनावणी घेऊन आवश्यक त्या सूचना संबंधित यंत्रणांना दिल्या जाणार आहेत. या बैठकीत महिला व बालविकास, पोलीस, शिक्षण, आरोग्य, समाजकल्याण, बाल न्याय मंडळ, बाल कल्याण समिती तसेच इतर संबंधित विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला जाणार आहे. बाल संरक्षणाशी संबंधित विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी, प्रलंबित प्रकरणांची सद्यस्थिती, विभागनिहाय समन्वयातील अडचणी आणि त्या दूर करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर चर्चा होणार आहे. बालकांच्या सर्वोत्तम हिताला प्राधान्य देत प्रत्येक प्रकरणाचा संवेदनशीलतेने विचार करण्याच्या दृष्टीने आयोग संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक मार्गदर्शन करणार आहे. तसेच बालहक्कांचे उल्लंघन रोखण्यासाठी आणि बाल संरक्षण व्यवस्थेला अधिक परिणामकारक बनविण्यासाठी आवश्यक निर्देशही दिले जाणार असल्याची माहिती जिल्हा महिला व बालविकास विभागाने दिली आहे. या दौऱ्यात महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष ॲड. संजय विष्णू पुराणिक यांच्या नेतृत्वाखाली आयोगाचे सचिव (अतिरिक्त कार्यभार) श्रीमती वंदना पु. जैन, सदस्य श्रीमती गीतांजली बाळाजी बुटी, श्रीमती शुभांगी संजय तांबट, श्री. संजय निळकंठराव लाखेपाटील, श्री. अतुल आनंदराव देसाई, श्री. प्रवीण संजाबराव भुजाडे आणि श्रीमती मिलन देवेंद्र जंगम यांच्यासह आयोगाचे वरिष्ठ अधिकारी सहभागी होणार आहेत.

जिल्ह्यातील बाल संरक्षण यंत्रणेच्या कार्यक्षमतेचे मूल्यमापन करण्याबरोबरच विविध विभागांमध्ये प्रभावी समन्वय निर्माण करण्यासाठी हा दौरा महत्त्वाचा ठरणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. यामुळे बालहक्क विषयक प्रकरणांच्या निपटाऱ्याला गती मिळण्यासोबतच बालकांच्या हक्कांचे संरक्षण अधिक प्रभावीपणे सुनिश्चित करण्यास मदत होणार आहे.

दरम्यान, जिल्हा महिला व बालविकास अधिकाऱ्यांनी संबंधित सर्व विभागांनी आवश्यक माहिती, प्रलंबित प्रकरणांचे तपशील आणि अंमलबजावणी अहवालांसह बैठकीस उपस्थित राहण्याच्या सूचना *(पान २ वर)*

### जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक यांच्या पदनामात बदल

**जालना - जिमाका**

शासनाच्या परिपत्रकानुसार महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र या पदनामा ऐवजी उप आयुक्त (उद्योग व सेवा) जिल्हा उद्योग केंद्र अशा सुधारीत पदनामाचा सर्व कार्यालयीन पत्र व्यवहार तसेच कार्यालयीन कामकाजामध्ये उल्लेख करण्याचे सुचित केले आहे. अशी माहिती सहायक आयुक्त उद्योग सेवा जिल्हा उद्योग केंद्र यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

## निवडणूक कामात हलगर्जीपणा; जालन्यात बीएलओ शिक्षकाविरुद्ध गुन्हा दाखल

एसआयआर मोहिमेत ९७३ अर्ज प्रलंबित, डिजिटायझेशनमध्ये गंभीर त्रुटी; लोकप्रतिनिधित्व अधिनियमांतर्गत कारवाई

**जालना । प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण मोहिमेदरम्यान निवडणूक कामात हलगर्जीपणा, दिरंगाई आणि शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी जालना शहरातील एका बूथ लेव्हल ऑफिसर () असलेल्या शिक्षकाविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

निवडणूक प्रक्रियेत निष्काळजीपणा केल्याप्रकरणी झालेल्या या कारवाईमुळे प्रशासनात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राष्ट्रीय हिंदी विद्यालय, जालना येथील सहाय्यक शिक्षक मिलिंद लक्ष्मण आगलावे यांची जालना विधानसभा मतदारसंघातील कन्हैयानगर (भाग क्रमांक ५८) येथे बीएलओ म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. विशेष संक्षिप्त पुनरीक्षण मोहिमेअंतर्गत मतदार पडताळणी, अर्ज स्वीकारणे, घरभेटी घेणे आणि अर्जांचे ऑनलाइन डिजिटायझेशन करण्याची जबाबदारी त्यांच्याकडे सोपविण्यात आली होती. मात्र मोहिमेदरम्यान संबंधित बीएलओ नागरिकांना प्रतिसाद देत नसल्याच्या अनेक तक्रारी प्रशासनाकडे प्राप्त झाल्या. तक्रारीनुसार, त्यांनी नागरिकांचे फोन उचलले नाहीत, वारंवार उडवाउडवीची उत्तरे दिली तसेच मतदारांच्या घरी प्रत्यक्ष भेट न देता आवश्यक पडताळणी टाळल्याचा आरोप करण्यात आला होता. त्यामुळे अनेक मतदारांचे अर्ज प्रलंबित राहिल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले.

या तक्रारींची गंभीर दखल घेत प्रशासनाने ३ ऑगस्ट २०२६ रोजी मनपा कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत आणि पंचांसमक्ष स्थळ पंचनामा केला. या तपासणीदरम्यान संबंधित बीएलओच्या ताब्यात तब्बल ९७३ न भरलेले अर्ज तसेच मोठ्या प्रमाणावर त्रुटी असलेले अर्ज आढळून आले. याशिवाय प्रत्यक्ष क्षेत्रात घरभेटी न देता बोगस किंवा डुप्लिकेट डिजिटायझेशन करण्यात आल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाल्याचा दावा प्रशासनाने केला आहे.

या प्रकारामुळे विशेष संक्षिप्त पुनरीक्षण मोहिमेच्या कामावर परिणाम झाला असून मतदार यादी अद्ययावत करण्याच्या प्रक्रियेलाही विलंब झाल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. निवडणूक आयोगाच्या निर्देशांचे पालन करण्यात निष्काळजीपणा झाल्याने ही बाब गंभीर मानण्यात आली. या प्रकरणी अतिरिक्त निवडणूक अधिकारी तथा जालना शहर महानगरपालिका आयुक्त यांच्या आदेशानुसार सहाय्यक शिक्षक बृजेश सर्वजीत पाल यांनी ५ ऑगस्ट २०२६ रोजी सदर बाजार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यानुसार लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० च्या कलम ३२ अन्वये प्रथम खबर क्रमांक ०६३२/२०२६ नुसार मिलिंद लक्ष्मण आगलावे यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल शारदा केरुभा गायकवाड करीत असून, तपासानंतर संबंधितांविरुद्ध पुढील कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

**निवडणूक कामातील निष्काळजीपणावर प्रशासनाचा कडक इशारा**

दरम्यान, निवडणूक आयोगाच्या विशेष पुनरीक्षण मोहिमेत नियुक्त सर्व बीएलओ, पर्यवेक्षक आणि संबंधित अधिकाऱ्यांनी जबाबदारीने काम करावे, अन्यथा निष्काळजीपणा किंवा जाणीवपूर्वक कामात अडथळा आणणाऱ्यांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट संदेश या कारवाईतून प्रशासनाने दिला आहे.

विशेष संक्षिप्त पुनरीक्षण मोहिमेचा उद्देश प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत समाविष्ट करणे आणि मतदार यादी अचूक व अद्ययावत ठेवणे हा असल्याने या प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज प्रक्रिया सुरू

### ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

राज्यातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत संचालित शासकीय वसतिगृहांमध्ये सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून, पात्र विद्यार्थ्यांनी शासनाच्या ://.. या ऑनलाइन संकेतस्थळावर दि. ७ ऑगस्ट ते दि. ३१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत अर्ज करावेत, असे आवाहन सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, जालना यांनी केले आहे.

प्रवेश प्रक्रियेसाठी निश्चित करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार, ऑनलाइन अर्ज दाखल झाल्यानंतर दि. १ सप्टेंबर ते दि. ७ सप्टेंबर २०२६ या कालावधीत अर्जांची छाननी करण्यात येणार आहे. त्यानंतर दि. ८ सप्टेंबर २०२६ रोजी गुणवत्तेनुसार पहिली निवड यादी प्रसिद्ध केली जाईल. पहिल्या निवड यादीतील विद्यार्थ्यांना दि. १८ सप्टेंबर २०२६ पर्यंत प्रवेश निश्चित करण्याची मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांसाठी गुणवत्तेनुसार दुसरी निवड यादी दि. २१ सप्टेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. दुसऱ्या निवड यादीतील विद्यार्थ्यांनी दि. ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी, असे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे.

ही प्रवेश प्रक्रिया बारावीनंतर उच्च शिक्षण घेणाऱ्या नवप्रवेशित विद्यार्थ्यांसाठी तसेच *(पान २ वर)*

## जालना तालुका काँग्रेसची आढावा बैठक संपन्न; 'रघुपती राघव राजाराम' आंदोलनाची रणनीती निश्चित

शेतकरी कर्जमाफी, पीककर्ज, लाडकी बहीण योजना, नीट-यूजी पेपरफुटीसह जनहिताच्या प्रश्नांवर आक्रमक भूमिका

**जालना । प्रतिनिधी**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या निर्देशानुसार जालना जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने बुधवारी (दि. ५ ऑगस्ट) जालना तालुका काँग्रेस कमिटीची आढावा बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. आगामी काळात जनतेच्या विविध प्रश्नांवर काँग्रेस पक्षाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या ''रघुपती राघव राजाराम'' आंदोलनाची रूपरेषा या बैठकीत निश्चित करण्यात आली. तसेच शेतकरी, युवक, महिला आणि सर्वसामान्य नागरिकांच्या



प्रश्नांवर अधिक प्रभावीपणे संघर्ष करण्याचा निर्धार पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

जालना शहरातील मा. खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या संपर्क कार्यालयात दुपारी २ वाजता झालेल्या या बैठकीस काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कल्याणराव दळे, माजी आमदार राजेश राठोड, प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र राख, बदरभाई चाऊस, माजी जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांच्यासह तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**जनतेच्या प्रश्नांवर सखोल चर्चा**

बैठकीत राज्य व जिल्ह्यातील विविध जनहिताच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. विशेषतः शेतकरी कर्जमाफीच्या यादीतील कथित त्रुटी, पीककर्ज वितरणातील अडचणी, लाडकी बहीण योजनेतील अपात्र लाभार्थ्यांचा प्रश्न, नीट-यूजी पेपरफुटी प्रकरण, तसेच जिल्ह्यातील विविध प्रलंबित विकासकामे आणि नागरिकांच्या समस्यांवर काँग्रेसने आक्रमक भूमिका घेण्याचा निर्णय घेतल्याची माहिती देण्यात आली.

पक्षाच्या वतीने या प्रश्नांवर लोकशाही मार्गाने व्यापक जनआंदोलन उभारले जाईल आणि *(पान २ वर)*

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.